लोकमत

## अंतिम सत्राच्या २२५ परीक्षा : शिवाजी विद्यापीठाला करावी लागणार तयारी

# ७५ हजार विद्यार्थ्यांची होणार परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखांतील विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम सत्राच्या परीक्षा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार घेण्याची तयारी शिवाजी विद्यापीठाला करावी लागणार आहे. त्याबाबत राज्य शासनाच्या निर्देशानुसार या परीक्षेचे स्वरुप आणि वेळापत्रक निश्चितीची कार्यवाही विद्यापीठाकडून केली जाणार आहे. या निर्णयानुसार अंतिम सत्रातील २२५ परीक्षा होतील. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकूण ७५ हजार विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) २९ एप्रिल रोजी विद्यापीठांना अंतिम वर्षाच्या परीक्षा जुलैमध्ये घेण्याची सूचना केली. त्यावर राज्य सरकारने समिती नेमून प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या परीक्षा रद्द करुन केवळ अंतिम वर्षाची परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. त्यावर शिवाजी विद्यापीठाने कार्यवाही करण्यासाठी कणसे समितीची नियुक्ती केली. या समितीने केलेल्या शिफारशींनुसार परीक्षा घेण्याचा निर्णय विद्यापीठाच्या विद्या परिषद या अधिकार मंडळाने घेतला. त्यानंतर परत लॉकडाऊनही वाढला. त्यानंतर तृतीय वर्षाच्या ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावयाची नाही आणि ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावयाची आहे, त्यांच्याकडून त्याबाबतचे लेखी संमतीपत्र घेण्याची सूचना विद्यापीठांना राज्य सरकारने केली. त्यातच यूजीसीने सप्टेंबरमध्ये परीक्षा घेण्याचे निर्देश जुलै महिन्यात दिले. आता सर्वोच्च न्यायालयाने परीक्षा घेण्याबाबतचा निर्णय दिला आहे. त्यानुसार परीक्षा घेण्याची तयारी विद्यापीठाला करावी लागणार आहे.

### ... विद्यार्थी आणि विद्यापीठाची अडचण

साडेतीन महिन्यांपासून विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील एक वसतिगृह आणि मुलांचे वसतिगृह क्रमांक एक, दोन आणि तीन आणि काही संलग्नित महाविद्यालये ही कोरोनामुळे जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात आहेत. त्या ठिकाणी संस्थात्मक अलगीकरणाची व्यवस्था केली आहे. जुलैमध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार असे गृहीत धरुन विद्यापीठाने संबंधित वसतिगृहे पुन्हा ताब्यात मिळावीत, यासाठी गेल्या दीड महिन्याभरापूर्वी जिल्हा प्रशासनाशी पत्रव्यवहार केला. त्यावर प्रशासनाने वसतिगृहे ताब्यात देण्यास असहमती दर्शविली होती. आता सप्टेंबरमध्ये परीक्षा घ्यायची असेल, तर वसतिगृहे विद्यापीठाच्या आणि महाविद्यालये संबंधित संस्थांच्या ताब्यात मिळाली पाहिजेत, अन्यथा विद्यार्थी व विद्यापीठाची अडचण होणार आहे.



“न्यायालयाच्या निर्णयानुसार अंतिम सत्राची परीक्षा घेण्याची तयारी विद्यापीठाला करावी लागणार आहे. त्याबाबत राज्य सरकार, यूजीसीच्या निर्देशानुसार आणि विद्यापीठ अधिकार मंडळांच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

**- गजानन पळसे**, प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

“अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्याबाबत समितीने यापूर्वीच विद्यापीठाला शिफारशी केल्या आहेत. स्थितीचा विचार करुन कार्यवाही व्हावी.- **डॉ. डी. जी. कणसे**, व्यवस्थापन परिषद

“परीक्षा झाल्याच पाहिजेत असे मला वाटते. आता निर्णय झाला आहे, तर परीक्षेचे स्वरुप, वेळापत्रकही लवकर जाहीर करण्यात यावे.

**- यशश्री पाचलग**, विद्यार्थिनी, केआयटी कॉलेज

# विद्यापीठात ७५ हजार परीक्षार्थी

## २२५ परीक्षांचे करावे लागणार त्वरित नियोजन

प्रतिनिधी

कोल्हापूर

अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत केंद्र सरकार व राज्य सरकारमध्ये वाद सुरु होता. यावर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर अखेर या वादावर पडदा पडला. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे आता विद्यापीठांना अंतिम वर्षाच्या परीक्षा घेणे बंधनकारक असणार आहे. यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या अखत्यारितील २२५ विविध अभ्यासक्रांच्या ७५ हजार विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागणार आहे.

अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यावरुन केंद्र सरकार व राज्य सरकारमध्ये वाद सुरु होता. केंद्र सरकार परीक्षा घेण्यावर तर राज्य सरकार परीक्षा न घेण्यावर ठाम होते. युजीसीने जुलै महिन्यात परीक्षा घेण्याच्या सूचना विद्यापीठांना दिल्या होत्या. मात्र राज्य सरकारने परीक्षा घेण्यास ठाम विरोध दर्शविला होता. याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. यावर सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी निकाल दिला. यामध्ये परीक्षा पुढे ढकलणे योग्य होईल पण रद्द करणे योग्य नाही. यामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याच्या सुचना दिल्या आहेत.

**राज्य शासनाच्या आदेशानंतर निर्णय**

अंतिम वर्षाच्या परीक्षाबाबत सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे. याबाबत अद्याप राज्य शासनाकडून कोणतीच मार्गदर्शक तत्वे शिवाजी विद्यापीठास प्राप्त झालेली नाही आहेत. राज्य शासनाकडून निर्देश येताच परीक्षांचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. गजानन पळसे यांनी दिली.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार आता शिवाजी विद्यापीठालाही अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे नियोजन करावे लागणार आहे. युजीसीच्या आदेशानंतर जुलै महिन्यातच शिवाजी विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत संसद समिती नेमली होती. यासमितीने परीक्षांबाबत आराखडा तयार केला होता. मात्र याचदरम्यान पुन्हा लॉकडाउन वाढल्याने परीक्षांची वेळ रखडली होती. आता पुन्हा शिवाजी विद्यापीठाला परीक्षांबाबत सर्व तयारी करावी लागणार आहे.

# 'केआयटी'तर्फे उद्या वेबिनारचे आयोजन

कोल्हापूर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर तरुणाईला मार्गदर्शन करण्यासाठी केआयटी कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने उद्या, रविवारी सकाळी ११ वाजता ' मनमोकळा श्वास' हा वेबिनार होणार आहे. यामध्ये समुपदेशक डॉ. कल्याणी कुलकर्णी, वैशाली बुटाले संवाद साधणार आहेत. प्रश्नोत्तरांतून तरुणाईच्या मनातील अनुत्तरित प्रश्नांना साद घातली जाणार आहे. या वेबिनारचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. अभय जायभाये यांच्या हस्ते होणार आहे. या वेबिनारमध्ये 'केआयटी'सह अन्य महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनाही सहभागी होता येणार आहे.